MHKO050043612019

<u>विशेष दिवाणी दावा क्र. १०७/२०२३ मधील नि. ६३ वरील आदेश</u>
(सारडा एक्सपोर्ट कॉर्पोरेशन वि. रमेश राजाराम ढामणे वगैरे )

प्रतिवादी क्र. ६ ने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता नियम १५१ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी नं.६ चे अर्जातील कथन असे आहे की, प्रस्तुत कामी त्यांनी हजर होऊन प्रतिदावा दाखल केलेला आहे. वाद मिळकतीमध्ये अतिक्रमण असलेबाबतचे वादीचे कथन खोटे आहे. प्रतिवादी नं.६ यांनी कोणत्याही प्रकारे वाद मिळकतीची मालकी व कब्जा वादी यांना दिलेली नसताना वादी यांची वाद मिळकतीमध्ये मालकी व कब्जेवहिवाट आहे असे ग्राह्य धरता येणार नाही. वादी यांनी दिलेल्या कोर्ट कमिशनचे अर्जास प्रतिवादी नं.६ चे विरुध्द म्हणणे नाहीचा आदेश पारित झालेला नाही. प्रतिवादीने वादीचे खरेदीपत्र आव्हानित केले असलेने वादीची मालकी जोपर्यंत शाबीत होत नाही तोपर्यंत दि.प्र.संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे कोणतीही दाद मागणेचा वादीला अधिकार नाही. वादीने दाव्यामध्ये तथाकथित कथन केलेले खरेदीपत्र हे खोटे व बनावट आहे. प्रतिवादी नं.६ यांनी कमलाकर विठोबा पालनकर यांचे लाभात कोणतेही नोंदणीकृत अधिकारपत्र करुन दिलेले नव्हते व नाही. त्यामुळे, निशाणी क्र. ५ वर झालेला कोर्ट कमिशनचा आदेश रद्द बातल होऊन मिळावे अशी विनंती केली आहे. तसेच कोर्ट कमिशन करावयाचे झाले तर प्रतिवादी नं.६ यांचे मालकीचे संपुर्ण गट नं. ८५८ या मिळकतीची मोजणी होऊन हद्दी निश्चित झालेस सत्य परिस्थिती न्यायालयासमोर येईल. त्यामुळे, उप अधिक्षक, भुमि अभिलेख, हातकणंगले यांना मोजणी बाबतचे आदेश द्यावेत अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जास निशाणी क्र. ७४ ला म्हणणे दाखल करुन प्रतिवादी नं.६ चे अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. वादीने पुढे असे कथन केले आहे की, प्रस्तुतचे कामी निशाणी क्र.५ वर मे. कोर्टांनी केलेल्या कोर्ट कमिशनच्या आदेशावर प्रतिवादी नं. ६ यांनी मे. जिल्हा न्यायालय, इचलकरंजी येथे किरकोळ दिवाणी अपिल दाखले केले होते. ते अपिल मे. न्यायालयाने मंजुर केले होते. त्याविरुध्द वादी यांनी नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे रिट पिटीशन नं. ९३२४४/२०२० दाखल केले होते. त्यावर नामदार उच्् न्यायालयाने अंशत: मंजुर करुन निशाणी क्र.५ वर झालेला मोजणी बाबतचा आदेश कायम केलेला आहे. अशी परिस्थिती असताना प्रतिवादी नं.६ यांचे मागणी प्रमाणे निशाणी क्र. ५ वरील आदेश रद्द बातल करता येणार नाही. तसेच प्रतिवादी नं.६ यांचे अर्जातील कलम १०-ब मधील विनंतीस अनुसरुन निशाणी क्र. ५ वरील मोजणीबाबत केलेल्या आदेशाप्रमाणे व नामदार उच्च न्यायालय यांनी दिलेल्या आदेशास अधिन राहुन प्रतिवादी नं.६ यांनी स्वतंत्र पणे फी भरुन मोजणी करुन घेणेस वादीची कोणतीही हरकत नाही. सबब, प्रतिवादी नं.६ चा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व म्हणणे पाहिले.

५. वादीने सदरचा दावा हक्कज्ञापनासाठी व निरंतर आणि आज्ञार्थी मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामध्ये वादीचे कथन असे आहे की, मौजे शहापूर येथील जमिन मिळकत क.ग. नं. ८५८ क्षेत्र २हे.२७ आर यापैकी २९.३३ आर मिळकत हा दाव्याचा वाद विषय आहे. प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये बांधकाम करुन वादीचे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये तसेच प्रतिवादी नं.१,२,४ व ५ यांनी दावा मिळकतीमध्ये केलेले बांधकाम स्वखर्चाने काढुन घ्यावे अशी मागणी केली आहे. दावा मिळकतीची मोजणी होणेसाठी वादीची काही हरकत नाही. सदर दाव्याचे कामी निशाणी क्र.५ वर मनाईचा व कोर्ट कमिशनचा अर्ज मंजुर झाला होता त्या आदेशाविरुध्द प्रतिवादी यांनी मे. जिल्हा न्यायालय, इचलकरंजी यांचे कोर्टात दाखल केलेले कि.दि.अपिल मंजुर झाले. त्यानंतर त्या अपिला विरुध्द वादी यांनी

मे. उच्च न्यायालय, मुंबई यांचे कडे दाखल केलेले पिटीशन मंजुर झाला व त्यामध्ये देखील मोजणी बाबतचा आदेश कायम करणेत आलेला आहे. अशा परिस्थितीत क.ग.नं. ८५८ ची मोजणी झालेस न्यायाचे दृष्टीने योग्य होणार आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्ज अंशत: मंजुर करणेत येत आहे.

२. उप अधिक्षक, भुमी अभिलेख, हातकणंगले यांना निर्देशित करणेत येते की, नियमित दिवाणी दावा क्र. ३३१/२०१९ मधील निशाणी क्र. ५ वरील झालेल्या आदेशाप्रमाणे मोजणी करुन तसा मोजणी नकाशा व अहवाल या कामी सदर आदेशापासुन दोन महिन्याचे आंत दाखल करणेत यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by GANI MANIK NADAF
Date: 2025.09.24 11:17:42 +0530

इचलकरंजी.
दिनांक – २२.०९.२०२५.

**(जी.एम. नदाफ)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.